Bharatiya Shikshan Prasarak Sanstha, Ambajogai

# Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed



# Internal Quality Assurance Cell

## Criteria 6- Governance, Leadership & Management

**6.1.1:** ***The institutional governance and leadership are in accordance with the vision and mission of the Institution and it is visible in various institutional practices such as NEP implementation, sustained institutional growth, decentralization, participation in the institutional governance and in their short term and long term Institutional Perspective Plan.***

## Reports of LLED

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई

# स्वा.सावरकर महाविद्यालय,बीड

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांनी स्वा. सावरकर महाविद्यालय,बीड यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे विस्तार विभाग केंद्र देण्यात आले. मागील अनेक वर्षापासून हा विभाग स्वा.सावरकर महाविद्यालयात कार्यरत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या कोविड कालावधीनंतर शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी महाविद्यालयातील खालील प्राध्यापकांची आजीवन शिक्षण व विस्तार विभागात नियुक्ती करण्यात आली.

| क्र. | प्राध्यापकाचे नाव | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.सचिन चंद्रशेखर कंदले | कार्यक्रमाधिकारी |
| २ | प्रा.डॉ.अरविंद प्रभाकर रायलवार | सदस्य |
| ३ | प्रा.डॉ.मेधा इंद्रकांत गोसावी | सदस्य |
| ४ | प्रा.दीपा रुक्मिणीकांत देशपांडे | सदस्य |
| ५ | श्री.सुनील लक्ष्मीकांत मोताळे | सदस्य |

महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी सूचना काढून दि.२४ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत आजीवन शिक्षण विभागाचे सदस्यत्व एका तयार केलेल्या फॉर्मद्वारे करण्यात आले. विभागातील सदस्यांनी एकूण ४० विद्यार्थ्यांची नोंदणी केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वार्षिक आराखड्यानुसार सर्व उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

- विभागाचे कार्यक्रम प्रामुख्याने दोन स्तरावर होतात

१. महाविद्यालय स्तर

२. समाज स्तर

या दोन स्तरावरच्या कार्यक्रमाबरोबरच "विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा" याचेही नियोजन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या कालावधीत झालेल्या सर्व उपक्रमांचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## महाविद्यालय स्तरावरील उपक्रम

➢ विस्तार केंद्र उद्घाटन

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सूचनेनुसार शुक्रवार, दि.०२ डिसेंबर २०२२ रोजी विस्तार केंद्राचे उद्घाटन करण्यात आले यावेळी प्रमुख वक्ते म्हणून उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. सचिन कंदले व विभागातील सदस्य यांची उपस्थिती होती. आजीवन शिक्षण विस्तार विभागातील विद्यार्थ्यांना या विभागाचे महत्त्व व उद्देश उपप्राचार्य तथा विभागाचे पूर्व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश ढेरे यांनी विशद केले. या उदबोधन वर्गाचे कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.कृष्णा बारटक्के यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दीपा देशपांडे यांनी मानले.

➢ निबंध स्पर्धा

मंगळवार, दि.१३ डिसेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते आले. "कोविड व लॉकडाऊन काळातील अनुभव' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेत एकूण सत्तावीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

प्रथम पारितोषिक रुपये ५०१/- ,द्वितीय पारितोषिक रुपये ३०१/- व तृतीय पारितोषिक २०१/- घोषित करण्यात आले. या निबंध स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थी खालीलप्रमाणे-

१. प्रथम पारितोषिक : कु.श्रद्धा श्रीकांत ठोसर

२. द्वितीय पारितोषिक : कु.सानिका अनिलराव कुलकर्णी

३. तृतीय पारितोषिक : कु.सोनाली चंद्रसेन कोकाटे

या निबंध स्पर्धेचे प्रमुख म्हणून प्रा.डॉ.अरविंद रायलवार यांनी काम पाहिले तर सहप्रमुख म्हणून प्रा. दीपा देशपांडे या होत्या. निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सोपान सुरवसे यांनी काम पाहिले. या तिन्ही विद्यार्थ्यांचा

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed.

Principal
Swa.Sawarkar Mahavidyalaya

सत्कार आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ. संजय मून, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.उमेश जगताप , प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर यांच्या हस्ते देण्यात आले. प्रमाणपत्र,पुस्तक व रोख रक्कम असे पारितोषिकाचे स्वरूप होते.

- शेती व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण

  दि.२७ डिसेंबर २०२२ रोजी श्री.अनंत देशपांडे यांनी शेती आधारित व्यवसाय कौशल्य या विषयावर आपले मनोगत व्यक्त करताना; सेंद्रिय शेतीच्या सहाय्याने म्हणजेच गोमूत्र, शेणखत यापासून बनवलेले खत व गोमूत्रापासून बनवलेले किटकनाशक याचा वापर करीत रसायनमुक्त शेतीचा ध्यास घ्यावा. रसायनमुक्त शेती अथवा अन्नधान्य हेच माणसाच्या शतायुषी होण्याचे कारण आहे. सेंद्रिय शेती हीच शाश्वत शेती आहे. शेतीचा कस सुधारण्यासाठी नैसर्गिक तंत्राचा अवलंब करावा असे आवाहन श्री.अनंत देशपांडे यांनी केले. 'शेती व्यवसायावर आधारित मार्गदर्शन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विभागाचे सदस्य हे उपस्थित होते. गावातील जवळपास शंभर शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शेतकऱ्यांची प्रश्नोत्तरे करून त्यांच्या मनातील शंका निरसन करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.आनंद रत्नपारखे यांनी केले.

- सामाजिक विषयावरील कीर्तन

बुधवार, दि.०२ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने सामाजिक विषयावरील कीर्तनाचे आयोजन करण्यात आले "विज्ञान" असा या कीर्तनाचा विषय होता महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना विज्ञान समजून घेणे आवश्यक आहे.वैद्न्यानिक क्रांतीने विश्व बदलले आहे.आगामी काळ हा विज्ञानेश्वरांचा असून या विज्ञान वारीमध्ये सर्वांनी सहभागी नव्हे तर त्याचे क्रियान्वय होणे गरजेचे आहे, संगणक क्रांती ही नव्या युगातील संधी आहे.अज्ञानमुक्त होण्यासाठी तसेच प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांचा,संतांचा अभ्यास करण्यासाठी विज्ञानाची कास धरणे गरजेचे असल्याचे असल्याचे प्रतिपादन संगणकशास्त्र प्रमुख श्री.भार्गवराम चौधरी यांनी केली. यावेळेस प्रा.आनंद रत्नपारखी तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सचिन कंदले यांची विशेष उपस्थिती होती.

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व विस्तार केंद्र उपक्रमातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed.

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

दि. ०२ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व विस्तार केंद्र उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. बीड शहरातील नामवंत उद्योजक श्री.अमोल विप्र यांच्या हस्ते या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.राजेश ढेरे हे होते तर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख प्रा.नारायण शिंदे व कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सचिन कंदले यांची उपस्थिती होती.

- घरोघरी तिरंगा अभियान

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अखिल भारतीय स्तरावर विविध संस्थांच्या माध्यमातून कार्यक्रमांचे आयोजन केले होते. याच अनुषंगाने महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने या अमृत महोत्सवानिमित्त 'घरोघरी तिरंगा अभियान' हा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालय परिसरातील विविध कॉलनी मध्ये जाऊन प्रत्येकाने आपल्या घरी दि. १५ ऑगस्ट रोजी तिरंगा ध्वज फडकवावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने एकूण शंभर तिरंगा ध्वजाचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य डॉ. देविदास नागरगोजे, उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकान्त बाहेगव्हाणकर, डॉ.राजेश ढेरे, यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. सचिन कंदले यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या काळातील अनेक घटनांचा संदर्भ देत तिरंगा ध्वज प्रत्येकाच्या घरी फडकाविण्याचे आवाहन केले.

- पोस्टर स्पर्धा

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने 'पोस्टर स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले या स्पर्धेचे उद्घाटन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य श्री. उमेश जगताप यांच्या हस्ते व संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. श्री. चंद्रकांत मुळे, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष श्री. गजाननराव जगताप, प्राचार्य डॉ.देविदास नागरगोजे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.सचिन कंदले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. एकूण २१ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवला. या स्पर्धेत प्रथम- ५०१/-रु., द्वितीय- ३०१/रु.- व तृतीय २०१/-रु.असे पारितोषिकाचे स्वरूप होते. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala, Beed

१. प्रथम पारितोषिक : कु. राधिका वझे
२. द्वितीय पारितोषिक : चि. अजय शिंदे
३. तृतीय पारितोषिक : कु. साक्षी भालेकर

## समाज स्तरावरील उपक्रम

➢ शेती व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण

दि. ०९ जानेवारी २०२३ रोजी शेती व्यवसायावर आधारित मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले.

प्राकृतिक रचनेनुसार सेंद्रिय शेती हीच कायम स्वरूपी व शाश्वत शेती आहे. शेतीचा कस सुधारण्यासाठी नैसर्गिक तंत्राचा अवलंब करावा व शेती समृद्ध करावी तसेच सेंद्रिय शेतीच्या सहाय्याने म्हणजेच गोमूत्र, शेणखत यापासून बनवलेले खत व गोमूत्रापासून बनवलेले किटकनाशक याचा वापर करीत रसायनमुक्त शेतीचा ध्यास घ्यावा रसायनमुक्त शेती अथवा अन्नधान्य हेच माणसाच्या शतायुषी होण्याचे कारण आहे असे आवाहन प्रयोगशील शेतकरी श्री.संजय काळे यांनी केले. मोजे शिदोड येथील श्री.महालक्ष्मी मंदिरात "शेती व्यवसायावर आधारित मार्गदर्शनव प्रशिक्षण" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विभागाच्या सदस्य डॉ.दीपा देशपांडे यांची उपस्थिती होती. गावातील जवळपास शंभर शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शेतकऱ्यांची प्रश्नोत्तरे करून त्यांच्या मनातील शंका निरसन करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.आनंद रत्नपारखे यांनी केले.यावेळी प्रा.डॉ.अनुजा कास्तीकर उपस्थित होत्या.

➢ सामाजिक विषयावरील कीर्तन

बुधवार, दि. ११ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने सामाजिक विषयावरील किर्तनाचे आयोजन करण्यात आले "व्यसनाधिनता" असा या किर्तनाचा विषय होता. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना व्यसनाधिन होण्याचा धोका अधिक असतो म्हणून तरुणांना व्यसनापासून मुक्त राहून सुदृढ शरीराची आवश्यकता असते यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर रहावे असा संदेश या

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed. B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed.

सामाजिक किर्तनातून ह. भ. प. श्री.अशोक महाराज रुपनोर यांनी केली. यावेळेस विभागातील प्रा.डॉ.अरविंद रायलवार,प्रा.आनंद रत्नपारखी तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सचिन कंदले यांची विशेष उपस्थिती होती.

प्रा.डॉ.सचिन कंदले — डॉ. प्रीती पोहेकर

कार्यक्रमाधिकारी — प्राचार्य

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई

## स्वा. सावरकर महाविद्यालय,बीड

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

## विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा

दि.०७ व ०८ फेब्रुवारी २०२३

उद्घाटन : मंगळवार, दि.०७फेब्रुवारी २०२३

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed. B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद व स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड यांच्या आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने दि. ०७ व ०८ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित केलेल्या विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवार, दि.०७ फेब्रुवारी २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.संजय मून यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.उमेश जगताप,प्राचार्य डॉ.प्रीती पोहेकर, उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकान्त बाहेगव्हाणकर,डॉ.राजेश ढेरे,कार्यक्रमाधिकारी डॉ.सचिन कंदले विभागातील सर्व प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

उद्घाटन कार्यक्रमात बोलताना डॉ.मून म्हणाले; कृषी आधारीत व्यवसायाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे.शेती हेच भारतीयांचे मूळ आणि सार्वजनिक उत्पन्नाचे साधन आहे त्यामुळे कृषी आणि कृषी आधारित व्यवसाय कौशल्याचा अभ्यासक्रमामध्ये समावेश होणे गरजेचे आहे असे सांगून महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने वर्षभर आयोजित केलेल्या उपक्रमांचे कौतुक करून आगामी काळात ही विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले तर प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर यांनी इव्हेंट मॅनेजमेंट सारखे विषय आता कोर्स च्या रूपानेही अभ्यासक्रमात आले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली तर विस्तार सेवेचे कार्य भारतीय शिक्षण प्रसारक संस्था मागील अनेक वर्षापासून करीत असल्याचे प्रतिपादन श्री.उमेश जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.सचिन कंदले यांनी विभागाने वर्षभर आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती मान्यवरांना दिली व दोन दिवसीय शिबिरात होणाऱ्या सत्राची माहिती दिली.

**सत्र पहिले : व्यक्तिमत्त्व विकास**

"व्यक्तिमत्त्व विकास " या विषयावर प्रा.ज्ञानेश्वर तांबे यांनी आपले विचार मांडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.सोपान सुरवसे हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.ज्ञानेश्वर तांबे यांनी आपला पोशाख,संभाषण,भाषेवरील प्रभुत्व आपली पहिली ओळख असते. प्रत्येकाकडे काही न काही चांगले गुण असतातच ते ओळखून त्याचा विकास करणे गरजेचे असते असे सांगितले. या सत्राचे संचलन कु.सानिका कुलकर्णी हिने केले तर आभार कु.वैभवी गरुड हिने मानले.

**सत्र दुसरे : लेखन व संभाषण कौशल्य**

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed.
B.S.P.S.

प्रा.डॉ.मेधा गोसावी यांनी "लेखन व संभाषण कौशल्य" या विषयावर आपले विचार मांडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. दीपा देशपांडे या होत्या . यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.मेधा गोसावी यांनी लेखन आणि संभाषण याचे महत्त्व विशद करताना या दोन्ही गोष्टी माणसाचे व्यक्तिमत्व सांगत असतात त्यामुळे लेखनात आपले अक्षर आणि भाषेवर प्रभुत्व असावे यासाठी भरपूर वाचनाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करून संभाषणाने माणसाची उंची कळते त्यामुळे आपले संभाषण माणसाचा दर्जा ठरवते म्हणून या दोन्ही गोष्टींचा विकास आपल्या ठायी असला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोपात माणसाची लेखन कृती हा तो व्यक्ती जाण्याच्या अगोदर त्याचे सर्व काही सांगून जात असते म्हणून लेखन कौशल्य आणि संवादातून संभाषण कौशल्य हे लक्षात येते असे सांगितले. या सत्राचे संचालन चि.अजय शिंदे यांनी केले तर आभार चि.गणेश जोशी याने मानले.

**सत्र तिसरे : स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन**

दि. ०८ फेब्रुवारी २०२३ रोजी तिसर्या सत्रात "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन" या विषयावर प्रा.श्री. नारायण शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्र सदस्य प्रा.डॉ.अरविंद रायलवार हे होते. यावेळी प्रारंभी प्रा.श्री. नारायण शिंदे यांनी परीक्षापद्धती, अभ्यासक्रमाची रचना व प्राथमिक ज्ञान अवगत करून विद्यार्थ्यांनी आपल्याला कोणत्या पदासाठी अभ्यास करायचा आहे हे सुनिश्चित करावे व त्यादृष्टीने मनातून अभ्यासाला प्रारंभ करावा, आपले ध्येय उराशी बाळगून जो विद्यार्थी अभ्यास करील तोच खऱ्या अर्थाने यात यशस्वी होईल. नियमितता, शरीराची सुदृढता, मनाची गंभीरता यासाठी आवश्यक आहे हे सांगून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थ्यांना केले.अध्यक्षीय समारोपात बोलताना प्रा.डॉ.अरविंद रायलवार म्हणाले; महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्रातून अनेक विद्यार्थी यापूर्वी यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेले आहेत. बँक, पोलीस, न्यायालये अशा विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून महाविद्यालयाची ही यशस्वी परंपरा अनेक वर्षापासून सुरु असल्याचे सांगितले. या सत्राचे सूत्रसंचालन कु.अंजली शिंदे हिने केले तर आभार चि.अनंत चव्हाण याने मानले.

**सत्र चौथे : यशस्वी उद्योजकाची मुलाखत**

नोकरी करणार्यापेक्षा नोकरी देणारे व्हा कारण त्यातील आनंद हा अधिक असतो.आपल्या सोबतच इतरांचा विकास साधण्याची वृत्ती जोपासली जोपासली पाहिजे. असे

Swa.Sawarkar Mahavidyalaya B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala, Beed

प्रतिपादन यशस्वी उद्योजक श्री.प्रशांत कल्याणकर यांनी केले. प्रयत्नाने काहीही साध्य होऊ शकते. आपल्यासारख्या तरुणांमध्ये ती शक्ती असते. शेवटी आपल्या प्रेरणादायी मनोगताचा समारोप करताना ते म्हणाले कि; आपल्याला ज्यांनी घडवलं अशा व्यक्तिंचा सदैव सन्मान आपण केला पाहिजे व त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा विचार करावा असे आवाहन केले.

**समारोप :**

दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोपाच्या सत्राचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. सचिन कंदले यावेळी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे यांनी आपल्या प्रत्येकामध्ये एखादा चांगला गुण नक्की असतोच याचा विकास आपण केला पाहिजे असे आवाहन केले. दोनदिवसीय झालेल्या कार्यशाळेचा वृत्तांत कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.सचिन कंदले यांनी सांगितला. या कार्यशाळेचे आभार प्रा. आनंद रत्नपारखे यांनी मानले.

प्रा.डॉ.सचिन कंदले — डॉ. प्रीती पोहेकर

कार्यक्रमाधिकारी — प्राचार्य

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई

## स्वा.सावरकर महाविद्यालय,बीड

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | महाविद्यालय स्तरावरील उपक्रम | |


Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed B.S.P.S. Ambajogai

Principal Swa.Sawarkar Mahavidyala, Beed.

| | | |
|---|---|---|
| ३ | समाजस्तरावरील उपक्रम | |
| ४ | विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा | |
| ५ | इंग्रजी माध्यम अहवाल | |
| ६ | छायाचित्र | |
| ७ | पेपर कटिंग | |
| ८ | प्रवेश फॉर्म | |
| ९ | विद्यार्थी यादी | |
| १० | Utilization certificate xerox copy | |

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed. ★ B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

# स्वा.सावरकर महाविद्यालय,बीड

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०१९-२०

**प्रस्तावना :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे विस्तार केंद्र म्हणून स्वा. सावरकर महाविद्यालय,बीड यांना देण्यात आले. मागील अनेक वर्षापासून हा विभाग स्वा.सावरकर महाविद्यालयात कार्यरत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९ साठी महाविद्यालयातील खालील प्राध्यापकांची आजीवन शिक्षण व विस्तार विभागात नियुक्ती करण्यात आली.

| क्र. | प्राध्यापकाचे नाव | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | प्रा. सचिन चंद्रशेखर कंदले | कार्यक्रमाधिकारी |
| २ | प्रा. संजय रामचंद्र काळे | सदस्य |
| ३ | प्रा. राम बाबुराव गव्हाणे | सदस्य |
| ४ | प्रा. राजपाल लालसिंग जाधव | सदस्य |
| ५ | प्रा. अशोक काशिनाथ होके | सदस्य |

दि.२८ते ३१ऑगस्ट २०१९ या कालावधीत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी सूचना काढून आजीवन शिक्षण विभागाचे सदस्यत्व एका तयार केलेल्या फॉर्मद्वारे करण्यात आले. कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी विभागातील सदस्यांनी प्रयत्न केले. एकूण ४५ विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वार्षिक आराखड्यानुसार सर्व उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. विभागाचे कार्यक्रम प्रामुख्याने दोन स्तरावर होतात –

१. महाविद्यालय स्तर
२. समाज स्तर

Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed. S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

या दोन स्तरावरच्या कार्यक्रमाबरोबरच "विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा" याचेही नियोजन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१९-२०

या कालावधीत झालेल्या सर्व उपक्रमांचा अहवाल सादर करीत आहोत.

## महाविद्यालय स्तरावरील उपक्रम

➢ विस्तार केंद्राचे उद्घाटन

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या कालावधीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सूचनेनुसार एकूण दिनांक गुरुवार ५ ऑगस्ट सप्टेंबर २०१९ रोजी विस्तार केंद्राचे उद्घाटन करण्यात आले यावेळी उपप्राचार्य डॉक्टर राजेश ढेरे कार्यक्रमाधिकारी प्रा सचिन कंदले यांची उपस्थिती होती यावेळी आजीवन शिक्षण विस्तार विभागातील विद्यार्थ्यांना या विभागाचे महत्त्व व उद्देश उपप्राचार्य तथा विभागाचे पूर्व कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ राजेश ढेरे यांनी विशद केले या उदबोधन वर्गाचे कार्यक्रमाचे संचलन प्रा राम गव्हाणे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा संजय काळे यांनी मानले.

➢ वृक्षारोपण

दिनांक ३० जुलै २०१९ रोजी महाराष्ट्र शासन यांच्या सूचनेनुसार तथा महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्यावतीने महाविद्यालय प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आली महाविद्यालयाच्या प्रांगणात मैदानावर माननीय प्राचार्य डॉक्टर संजय शिरोडकर यांच्या उपस्थितीत विभागातील सर्व सहकारी प्राध्यापक व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण

➢ स्वच्छता अभियान

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व लक्षात यावे तसेच माननीय पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानुसार परिसर स्वच्छता करण्यात आली महाविद्यालयातील क्रीडा मैदान वर्गखोल्या व विविध कार्यालय यांची स्वच्छता करण्यात आली यावेळेस विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची प्रतिज्ञा देण्यात आली सकाळी नऊ ते अकरा या वेळेत महाविद्यालयातल्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली.

➢ **निबंध स्पर्धा**

महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने दिनांक २१ऑगस्ट २०१९ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते आले.

मराठवाड्यातील दुष्काळ व उपाय योजना या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेत एकूण सत्तावीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed. P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed

प्रथम पारितोषिक रुपये ५०१/- तर द्वितीय पारितोषिक रुपये ३०१/- असे घोषित करण्यात आले. या निबंध स्पर्धेत-

कु.सायली कल्याण राऊत (विज्ञान द्वितीय वर्ष) ही विद्यार्थिनी प्रथम पारितोषिकाची मानकरी ठरली तर-

द्वितीय पारितोषिक वाणिज्य तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु.निशा अरुण पतंगे हीस प्राप्त झाले. या निबंध स्पर्धेचे प्रमुख म्हणून प्रा. राम गव्हाणे यांनी काम पाहिले तर सहप्रमुख म्हणून प्रा. संजय काळे हे होते. निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी काम पाहिले. या दोन्ही विद्यार्थ्यांचे सत्कार आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ. संजय मून, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या विद्यासभेचे अध्यक्ष श्री. किरण भावठाणकर, संस्थेचे सहकार्यवाह प्रा.चंद्रकांत मुळे, प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर यांच्या हस्ते देण्यात आले. प्रमाणपत्र व रोख रक्कम असे पारितोषिकाचे स्वरूप होते.

- **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व विस्तार केंद्र उपक्रमातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण**

महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व विस्तार केंद्र उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. बीड शहरातील नामवंत उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते श्री. गौतम खटोड यांच्या हस्ते या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर यांची अध्यक्षस्थानी उपस्थिती होती तर उपप्राचार्य राजेश ढेरे कार्यक्रम अधिकारी प्रा सचिन कंदले यांची उपस्थिती होती.

- **सामाजिक विषयावरील कीर्तन**

गुरुवार दि. ३ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने सामाजिक विषयावरील कीर्तनाचे आयोजन करण्यात आले "व्यसनाधीनता" असा या कीर्तनाचा विषय होता महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना व्यसनाकडे जाण्याचा धोका असतो तसेच या अवस्थेतील तरुणांना व्यसनापासून मुक्त राहून सुदृढ शरीराची आवश्यकता असते यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर रहावे असा संदेश या सामाजिक कीर्तनातून करण्यात आला. हे कीर्तन महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाचे प्रा. ह. भ. प. श्री. अशोक महाराज रुपनोर यांनी केली. यावेळेस विभागातील प्रा.संजय काळे,प्रा.आनंद रत्नपारखी तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.सचिन कंदले यांची विशेष उपस्थिती होती.

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed. B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed

# समाज स्तरावरील उपक्रम

## ➢ सामाजिक विषयावरील कीर्तन

समाजातील तरुणांनी व्यसनमुक्त रहावे व आपली शरीरसंपदा वृद्धिंगत करावी यासाठी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने मौजे कर्झणी ता. जि. बीड येथे व्यसनमुक्ती विषयावरील कीर्तन आयोजित केले होते मौजे कर्झणी येथील हनुमान मंदिर परिसरात ह.भ.प.श्री. अशोक महाराज रुपनोर यांनी उपस्थित तरुणांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला ।
तो संगे नाडला साधू ऐसा ।।

या तुकाराम महाराजांच्या अभंगाने व्यसनाधीनतेपासून माणसाने कसे दूर राहावे याचे निरूपण अशोक महाराजांनी केले.
या कीर्तनाने उपस्थित श्रोतेही मंत्रमुग्ध झाले. या कीर्तनासाठी विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन कंदले प्रा. संजय काळे प्रा. आनंद रत्नपारखे हे उपस्थित होते तसेच ग्रामस्थ श्री. उत्तम खटाने श्री. बंसी खटाने व सरपंच गणेश साबळे यांची विशेष उपस्थिती होती. गावातील भजनी मंडळाचेही सहकार्य यावेळी लाभले

विषाने पक्कान्ने गोड कडू झाली ।
कुसंगाणे केली तैसी परी ।।

आचरणाने कुसंगती ही जीवनात धोकादायक असते याचे विवेचन महाराजांनी ग्रामस्थांना केले.

## ➢ ग्रामीण समस्या व युवकांचे योगदान

ग्रामीण समस्या जाणून घेण्यासाठी गावातच जावे लागते तसेच गावातील समस्यांची नीट ओळख करून घेऊन गावातील तरुणांनीच याच्यावर उपाय शोधला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींनी पाहिलेले स्वयंपूर्ण खेड्याचे स्वप्न साकार होईल असे आवाहन मौजे कर्जनी येथे प्रा अनंत देशपांडे यांनी व्यक्त केले. अस्वच्छता व्यसनाधिनता अंधश्रद्धा अज्ञान या गावातील प्रमुख समस्या असून या समस्यांचे निराकरण गावातील तरुणांनी समजून घेतले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी प्रा सचिन कंदले यांची उपस्थिती होती.

## ➢ महिला व बाल आरोग्य तपासणी शिबिर

बीड तालुक्यातील मौजे कर्झणी हे गाव तसे नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध बालाघाट डोंगराच्या रांगा आणि गाव यांच्या मधोमध असणारी आणि पूर्णपणे भरलेली नदी हिरवाईने नटलेला परिसर अशाही गावात महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते हे जाणून विभागाच्यावतीने महिला आरोग्य शिबिर घेण्यात आली यावेळी बीड येथील

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala

B.S.P.S. Ambajogai Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed.

प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ.सौ. दीप्ती वैद्य व डॉ.सौ. संजीवनी कोटेचा यांनी महिलांची आरोग्य तपासणी केली व नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध असणाऱ्या गावातही कुपोषित असणाऱ्या रुग्णांना मार्गदर्शन केले तसेच यावेळी नामवंत बालरोगतज्ञ डॉ.श्री. अनुराग पांगरीकर यांनी जिल्हा परिषद शाळेतील तील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. दंतरोग, कुपोषण यासंबंधीचे मार्गदर्शन करून योग्य ती औषधेही ही मोफत स्वरूपात दिली. यावेळी एकूण ४२ महिलांची व ६१ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

- शेती व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण

नैसर्गिक अथवा सेंद्रिय शेती हीच कायम स्वरूपी शेतीच्या विकासाची आहे कारण प्राकृतिक रचना त्या पद्धतीची आहे शेतीचा कस सुधारण्यासाठी नैसर्गिक तंत्राचा अवलंब करावा व शेती समृद्ध करावी तसेच सेंद्रिय शेती चा उपयोग करावा गोमूत्र शेणखत यापासून बनवलेले खत अथवा गोमुत्रा पासून बनवलेले कीटकनाशक याचा वापर करीत रसायनमुक्त शेतीचा ध्यास घ्यावा रसायनमुक्त शेती अथवा अन्नधान्य हेच माणसाच्या शतायुषी होण्याचे कारण आहे असे आवाहन ज्येष्ठ शेती तज्ञ व सेंद्रिय शेतीचे पुरस्कर्ते पद्मश्री सुभाष पाळेकर यांचे शिष्य श्री. लक्ष्मीकांत जोशी व श्री. प्रकाश जाधव यांनी केले मौजे कर्झणी येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात "नैसर्गिक शेती व शेती पूरकव्यवसाय मार्गदर्शन" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रगतशील शेतकरी श्री. प्रवीण सोळंके हे उपस्थित होते. गावातील जवळपास शंभर शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शेतकऱ्यांची प्रश्नोत्तरे करून त्यांच्या मनातील शंका निरसन करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा सचिन कंदले यांची उपस्थिती होती.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद
## स्वा. सावरकर महाविद्यालय,बीड
## विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा
## दि.२२ व २३ जानेवारी २०२०

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद व स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड यांच्या आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने दिनांक २२ व २३ जानेवारी २०१९-२० रोजी आयोजित केलेल्या विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसीय

Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed B.S.P.S. Ambajogai

Principal
Swa.Sawarkar Mahavidyala, Beed

कार्यशाळेचे उद्धाटन बुधवार, दि. २२ जानेवारी २०२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.संजय मून यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या विद्यासभेचे अध्यक्ष श्री.किरण भावठाणकर तर अध्यक्षस्थानी संस्थेचे सहकार्यवाह प्रा. चंद्रकांत मुळे हे होते. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर, कार्यक्रमाधिकारी सचिन कंदले विभागातील सर्व प्राध्यापक , स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.
उद्धाटन कार्यक्रमात बोलताना डॉ.मून म्हणाले; विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वेळ महाविद्यालयात व्यतीत करावा कारण महाविद्यालयीन जीवनातील पाच वर्षे ही व्यक्तीच्या आयुष्याला कलाटणी देणारी असतात तसेच प्रयोगाद्वारे घेतलेले शिक्षण हेच सक्षम असते. यासाठी प्रयोगातून शिक्षण आपण घेतले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना विद्यासभेचे अध्यक्ष श्री. किरण भावठाणकर यांनी विद्यासभेची रचना व उद्देश उपस्थितांना सांगितला संस्थेने या संबंधित केलेला विचार हा विद्यार्थ्यांच्या सुदृढ भविष्यासाठी आहे. असे मत व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोपात प्रा. चंद्रकांत मुळे यांनी समुपदेशन आणि व्यवसायाचे मार्गदर्शन ही आत्ताच्या काळातील अत्यंत आवश्यक अशी बाब आहे. कारण आगामी काळात तरुणांना अनेक संकटांना सामोरे जावे लागणार आहे परंतु नैराश्य न येऊ देता धैर्याने त्याचा सामना करण्याची गरज आहे असे सांगून महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने वर्षभर आयोजित केलेल्या उपक्रमांचे कौतुक करून आगामी काळात ही विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले. प्रारंभी कार्यक्रमाधिकारी प्रा.सचिन कंदले यांनी विभागाने वर्षभर आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती मान्यवरांना दिली व दोन दिवसीय शिबिरात होणाऱ्या सत्राची माहिती दिली.

या कार्यक्रमात प्रा.हंसराज उद्धवराव जोशी यांची अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या पदव्युत्तर परीक्षेत प्रा. सौ. सुवर्णा तालखेडकर यांचा प्रबंध विद्यापीठातून सर्वप्रथम आल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या "अविष्कार २०२०" या स्पर्धेत यशस्वी सहभागी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला या उद्धाटन कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार प्रा संजय काळे यांनी मानले.

दुसऱ्या सत्रात "लेखन व संभाषण कौशल्य" या विषयावर प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी आपले विचार मांडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. उत्तम साळवे हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गटकळ यांनी लेखन आणि संभाषण याचे महत्त्व विशद करताना या दोन्ही गोष्टी माणसाचे व्यक्तिमत्व सांगत असतात त्यामुळे लेखनात आपले अक्षर आणि भाषेवर प्रभुत्व असावे यासाठी भरपूर वाचनाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करून संभाषणाने माणसाची उंची कळते

Swa.Sawarkar Mahavidyalaya, Beed.
Principal
Swa.Sawarkar Mahavidyala,
Beed.

त्यामुळे आपले संभाषण माणसाचा दर्जा ठरवते म्हणून या दोन्ही गोष्टींचा विकास आपल्या ठायी असला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोपात माणसाची लेखन कृती हा तो व्यक्ती जाण्याच्या अगोदर त्याचे सर्व काही सांगून जात असते म्हणून लेखन कौशल्य आणि संवादातून संभाषण कौशल्य हे लक्षात येते असे सांगितले. या सत्राचे संचालन प्रा. राम गव्हाणे यांनी केले तर आभार प्रा. संजय काळे यांनी मानले.

तिसऱ्या सत्रात "व्यक्तिमत्व विकास" या विषयावर प्रा. डॉ. अरुण दैतकार यांनी आपले विचार मांडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. राजपाल जाधव हे होते व्यक्तिमत्त्वात पोशाख, संभाषण, संवाद या सर्व गोष्टीचा अंतर्भाव असतो. योग्य त्या वेळी योग्य तो पोशाख व सुयोग्य असे भाषण तसेच दोन व्यक्ती मधला संवाद हा माणसाच्या मोठेपणाचा संदर्भ देतो. असे सांगितले या सत्राचे संचालन प्रा.आनंद रत्नपारखे तर आभार प्रा अशोक रूपनोर यांनी मानले.

